भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८

(१९८८ चा अधिनियम क्रमांक ४९)

[२ सप्टेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान]

# The Prevention of Corruption Act, 1988

**(Act No. 49 of 1988)**

*[As in force on the 2nd September 1991]*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.

१९९४

[किंमत : रु. ३-३०]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २ सप्टेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ४, अंक ३, दिनांक ११ नोव्हेंबर १९९३ यात पृष्ठ २०७ ते २१६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ११ नोव्हेंबर १९९३.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Prevention of Corruption Act, 1988 as on the 2nd September 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Vol. 4, dated 11th November 1993 on pages 207 to 216.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 11th November 1993.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८

(१९८८ चा अधिनियम क्रमांक ४९)

कलमांचा क्रम


कलमे

प्रकरण पहिले

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार.
२. व्याख्या.

प्रकरण दुसरे

विशेष न्यायाधीशांची नियुक्ती

३. विशेष न्यायाधीश नियुक्त करण्याची शक्ती.
४. विशेष न्यायाधीशांकडून संपरीक्षायोग्य प्रकरणे.
५. विशेष न्यायाधीशाची कार्यपद्धती व त्याच्या शक्ती.
६. संक्षिप्त संपरीक्षा करण्याची शक्ती.

प्रकरण तिसरे

अपराध व शास्ती

७. लोकसेवकाने पदीय कार्याच्या बाबतीत वैध पारिश्रमिकाहून अन्य परितोषण घेणे.
८. लोकसेवकावर प्रभाव पाडण्यासाठी भ्रष्ट किंवा अवैध मार्गाने परितोषण घेणे.
९. लोकसेवकावर वैयक्तिक प्रभाव पाडण्यासाठी परितोषण घेणे.
१०. कलम ८ किंवा ९ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांस लोकसेवकाने अपप्रेरणा दिल्याबद्दल शिक्षा.
११. लोकसेवकाने केलेल्या कार्यवाहीत किंवा व्यवहारात निबद्ध असलेल्या व्यक्तीकडून अशा लोकसेवकाने प्रतिफलाविना मौल्यवान वस्तू मिळवणे.
१२. कलम ७ किंवा कलम ११ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांना अपप्रेरणा देण्याबद्दल शिक्षा.
१३. लोकसेवकाचे फौजदारीपात्र गैरवर्तन.
१४. कलमे ८, ९ व १२ यांखाली नित्यश: अपराध करणे.
१५. प्रयत्नासाठी शिक्षा.
१६. द्रव्यदंड निश्चित करताना विचारात घ्यावयाच्या बाबी.

प्रकरण चौथे

या अधिनियमाखालील प्रकरणांचे अन्वेषण

१७. अन्वेषण करण्यास प्राधिकृत व्यक्ती.
१८. बँककार बह्यांचे निरीक्षण करण्याची शक्ती.

कलमे

## प्रकरण पाचवे

### खटल्यासाठी मंजुरी आणि इतर संकीर्ण उपबंध


१९. खटल्यासाठी पूर्वमंजुरी आवश्यक.

२०. लोकसेवक वैध पारिश्रमिकाव्यतिरिक्त परितोषण स्वीकारतो त्यावेळेचे गृहीतक.

२१. आरोपी व्यक्ती सक्षम साक्षीदार असणे.

२२. विशिष्ट फेरबदलांच्या अधीनतेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) लागू होणे.

२३. कलम १३ (१) (ग) खालील अपराधासंबंधातील आरोपामधील तपशील.

२४. एखाद्या व्यक्तीचे निवेदन तिला खटल्यास दायी करणार नाही.

२५. सैनिकी, नौसैनिकी आणि वायुसैनिकी वा इतर कायद्यावर परिणाम होणार नाही.

२६. १९५२ च्या अधिनियम क्रमांक ४६ अन्वये नियुक्त केलेले विशेष न्यायाधीश या अधिनियमान्वये नियुक्त केलेले न्यायाधीश असतील.

२७. अपील व पुनरीक्षण.

२८. हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याच्या भरीला असेल.

२९. १९४४ चा अध्यादेश क्रमांक ३८ याचे विशोधन.

३०. निरसन व व्यावृत्ती.

३१. १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या विवक्षित कलमांची वगळणूक.

# भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८

## (१९८८ चा अधिनियम क्रमांक ४९)

[दिनांक २ सप्टेंबर १९९१ रोजी यथाविधमान]

[९ सप्टेंबर, १९८८]

### प्रकरण १

### प्रारंभिक

**भ्रष्टाचार प्रतिबंध आणि त्याच्याशी संबंधित बाबींचा कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या एकोणचाळीसाव्या वर्षी संसदेकडून खालीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

१. (१) या अधिनियमास, "भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८" असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे आणि भारता-बाहेरील भारतीय नागरिकांना तो लागू होतो.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "निवडणूक" याचा अर्थ, संसद किंवा कोणतेही विधानमंडळ, स्थानिक प्राधिकरण किंवा इतर सार्वजनिक प्राधिकरण यांच्या सदस्यांची निवड करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही प्रकारे घेतलेली निवडणूक, असा आहे ;

(ख) "सार्वजनिक कर्तव्य" याचा अर्थ, जे कर्तव्य बजावण्यात राज्याला, जनतेला किंवा संपूर्ण समाजाला आस्था असते असे कर्तव्य, असा आहे ;

**स्पष्टीकरण.**—या खंडामधील "राज्य" यामध्ये, केंद्रीय, प्रांतीय किंवा राज्य अधिनियमा-द्वारे किंवा अन्वये स्थापन करण्यात आलेले निगम अथवा शासनाच्या किंवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या करण्यात आलेल्या शासकीय कंपनीच्या मालकीचे किंवा तिच्याद्वारे नियंत्रित किंवा अर्थसहाय्यित प्राधिकरण किंवा निकाय यांचा समावेश होतो ;

(ग) "लोकसेवक" याचा अर्थ,—

(एक) शासनाच्या सेवेतील किंवा शासनाकडून वेतन घेणारी किंवा कोणतेही सार्व-जनिक कर्तव्य बजावण्यासाठी शासनाकडून फीच्या किंवा कमिशनच्या स्वरूपात पारिश्रमिक दिली जाणारी कोणतीही व्यक्ती ;

(दोन) स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील किंवा त्याच्याकडून वेतन घेणारी कोणतीही व्यक्ती ;

(तीन) केंद्रीय, प्रांतीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्थापन करण्यात आलेल्या निगमाच्या अथवा शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाद्वारे नियंत्रित किंवा अर्थ-सहाय्यित अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा निकायाच्या अथवा कंपनी अधिनियम १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या करण्यात आलेल्या शासकीय कंपनीच्या सेवेत असणारी किंवा त्यांच्याकडून वेतन घेणारी कोणतीही व्यक्ती ;

(चार) जिला कोणतीही अभिनिर्णयाची कार्ये एकतर स्वतःहून किंवा व्यक्तींच्या कोणत्याही निकायाचा सदस्य या नात्याने पार पाडण्याच्या शक्ती प्रदान करण्यात आलेल्या आहेत अशा कोणत्याही व्यक्तीसह कोणताही न्यायाधीश ;

(पाच) न्यायदानासंबंधातील कोणतेही कर्तव्य बजावण्यासाठी न्यायालयाद्वारे प्राधिकृत करण्यात आलेली, अशा न्यायालयाकडून नियुक्त करण्यात आलेला परिसमापक, प्रापक किंवा आयुक्त यांसह कोणतीही व्यक्ती ;

(सहा) न्यायालयाने किंवा सक्षम सार्वजनिक प्राधिकरणाने निर्णयासाठी किंवा अहवालासाठी एखादा वाद किंवा प्रकरण ज्याच्याकडे निर्देशित केले असेल असा कोणताही लवाद किंवा अन्य व्यक्ती ;

(सात) ज्या पदाच्या आधारे, एखाद्या व्यक्तीला मतदारांची यादी तयार करण्याची, प्रकाशित करण्याची, ती ठेवण्याची किंवा त्यात सुधारणा करण्याची अथवा निवडणूक किंवा अंशतः निवडणूक घेण्याची शक्ती प्रदान करण्यात आली असेल असे पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती ;

(आठ) ज्या पदाच्या आधारे एखाद्या व्यक्तीला कोणतेही सार्वजनिक कर्तव्य पार पाडण्यास प्राधिकृत करण्यात किंवा फर्मावण्यात आले असेल असे पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती ;

(नऊ) केंद्र शासन किंवा राज्य शासन यांच्याकडून अथवा केंद्रीय, प्रांतीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही निगमाकडून अथवा शासनाच्या मालकीचे किंवा शासनाकडून नियंत्रित होणारे किंवा अर्थसहाय्य मिळणारे कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय यांजकडून अथवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या करण्यात आलेल्या शासकीय कंपनीकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळत असलेल्या किंवा मिळालेल्या, कृषिविषयक, औद्योगिक, व्यापारी किंवा बँकव्यवसाय करणाऱ्या नोंदणीकृत सहकारी संस्थेचा अध्यक्ष, कार्यवाह किंवा इतर पदाधिकारी असलेली कोणतीही व्यक्ती ;

(दहा) कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या कोणत्याही सेवा आयोगाचा किंवा मंडळाचा अध्यक्ष, सदस्य किंवा कर्मचारी असलेली कोणतीही व्यक्ती, अथवा अशा आयोगाने किंवा मंडळाने अशा आयोगाच्या किंवा मंडळाच्या वतीने कोणतीही परीक्षा आयोजित करण्यासाठी वा कोणतीही निवड करण्यासाठी नेमलेल्या कोणत्याही निवड समितीचा सदस्य;

(अकरा) कुलगुरु किंवा कोणत्याही नियामक मंडळाचा सदस्य असलेली कोणतीही व्यक्ती, कोणत्याही विद्यापीठाचा प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता किंवा अन्य कोणताही शिक्षक किंवा कोणतेही पदनाम असलेला कर्मचारी आणि परीक्षा घेण्यासाठी किंवा आयोजित करण्यासाठी विद्यापीठाकडून किंवा अन्य कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडून जिच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात आल्या असतील अशी कोणतीही व्यक्ती ;

(बारा) केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन किंवा स्थानिक वा अन्य सार्वजनिक प्राधिकरण यांजकडून कोणतेही वित्तीय सहाय्य मिळत असणाऱ्या किंवा मिळालेल्या कोणत्याही पद्धतीने स्थापन करण्यात आलेल्या, शैक्षणिक, वैज्ञानिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा इतर संस्थेचा पदाधिकारी किंवा कर्मचारी असलेली कोणतीही व्यक्ती.

**स्पष्टीकरण १.**—वरीलपैकी कोणत्याही उपखंडाखाली येणाऱ्या व्यक्ती या लोकसेवक आहेत—मग त्या शासनाकडून नियुक्त झालेल्या असोत वा नसोत.

**स्पष्टीकरण २.**—ज्या ज्या ठिकाणी "लोकसेवक" हा शब्द येईल तेथे लोकसेवकाचे स्थान प्रत्यक्ष धारण करणारी प्रत्येक व्यक्ती असा त्याचा अर्थ होईल—मग ते स्थान धारण करण्याच्या त्याच्या अधिकारात कोणतीही वैध त्रुटी असो.

## प्रकरण दुसरे

### विशेष न्यायाधीशांची नियुक्ती

**विशेष न्यायाधीश नियुक्त करण्याची शक्ती.** ३. (१) केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, खालील अपराधांची संपरीक्षा करण्यासाठी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी किंवा अशा प्रकरणांसाठी किंवा प्रकरणाच्या गटासाठी आवश्यक असतील इतक्या विशेष न्यायाधीशांची नियुक्ती करता येईल, ते अपराध असे :—

(क) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असा कोणताही अपराध; आणि

(ख) खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणताही अपराध करण्याचा कोणताही कट, कोणताही प्रयत्न किंवा कोणतेही अपप्रेरण.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये एखादी व्यक्ती विद्यमान किंवा भूतपूर्व सत्र न्यायाधीश किंवा अपर सत्र न्यायाधीश किंवा सहायक सत्र न्यायाधीश असल्याखेरीज या अधिनियमान्वये विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास अर्ह असणार नाही.

**विशेष न्यायाधीशांकडून संपरीक्षायोग्य प्रकरणे.** ४. (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधांची संपरीक्षा फक्त विशेष न्यायाधीशांकडूनच केली जाईल.

(२) कलम (३) च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक अपराधाची संपरीक्षा, तो जेथे करण्यात आला असेल त्या क्षेत्राच्या विशेष न्यायाधीशाकडून किंवा, प्रकरणपरत्वे, त्या प्रकरणासाठी नियुक्त केलेल्या विशेष न्यायाधीशाकडून केली जाईल अथवा अशा क्षेत्रासाठी एकाहून अधिक विशेष न्यायाधीश असतील तेथे, त्यांच्यापैकी केंद्र शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका विशेष न्यायाधीशाकडून केली जाईल.

(३) कोणत्याही प्रकरणाची संपरीक्षा करताना, विशेष न्यायाधीशाला, त्याच संपरीक्षेत, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये, आरोपीवर आरोप करता येईल अशा, कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अपराधाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करता येईल.

(४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, विशेष न्यायाधीश, व्यवहार्य असेल तेथवर, दैनंदिन पद्धतीने अपराधाची संपरीक्षा करील.

५.१ (१) विशेष न्यायाधीशाला, आरोपीला त्याच्याकडे संपरीक्षेसाठी संप्रेषित केलेले नसतानाही, आरोपांची दखल घेता येईल आणि आरोपी व्यक्तींची संपरीक्षा करताना तो, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये, दंडाधिकाऱ्यांनी, करावयाच्या अधिपत्र खटल्यांच्या संपरीक्षेसाठी विहित केलेली कार्यपद्धती अनुसरील. **विशेष न्यायाधीशाची कार्यपद्धती व त्याच्या शक्ती.**

(२) विशेष न्यायाधीशाला, अपराधाशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असल्याचे किंवा त्यात सहभागी असल्याचे गृहीत धरण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीची साक्ष मिळविण्याच्या दृष्टीने, अशा व्यक्तीला, अपराधासंबंधीची आणि संबंधित अशा प्रत्येक अन्य व्यक्तीसंबंधीची—मग ती व्यक्ती प्रत्यक्ष अपराध करणारी असो किंवा अपप्रेरक असो—तिला ज्ञात असलेली संपूर्ण परिस्थिती पूर्णपणे व खरेपणाने ती उघड करील या शर्तीवर क्षमा करता येईल आणि अशा प्रकारे केलेली कोणतीही क्षमा म्हणजेच फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या कलम ३०८ च्या पोटकलम (१) ते (५) च्या प्रयोजनांसाठी, त्या संहितेच्या कलम ३०७ अन्वये करण्यात आलेली क्षमा आहे असे समजण्यात येईल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) चे उपबंध, ते या अधिनियमाशी विसंगत नसतील तेथवर, विशेष न्यायाधीशापुढील कार्यवाहीला लागू होतील आणि उक्त उपबंधांच्या प्रयोजनांसाठी, विशेष न्यायाधीशाचे न्यायालय हे, सत्र न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि विशेष न्यायाधीशासमोर खटला चालविणारी व्यक्ती ही सरकारी अभियोक्ता असल्याचे समजण्यात येईल.

(४) विशेषत: आणि पोटकलम (३) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) ची कलमे ३२६ व ४७५ चे उपबंध शक्यतोवर, विशेष न्यायाधीशासमोरील कार्यवाहीस लागू होतील आणि उक्त उपबंधांच्या प्रयोजनांसाठी, विशेष न्यायाधीश हा दंडाधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

(५) विशेष न्यायाधीशाकडून सिद्धदोष ठरवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिला ज्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आले असेल त्यासाठी कायद्यान्वये जी शिक्षा प्राधिकृत करण्यात आली असेल तसा शिक्षादेश देता येईल.

(६) या अधिनियमान्वये शिक्षापात्र अशा अपराधाची संपरीक्षा करताना, विशेष न्यायाधीश, फौजदारी कायदा विशोधन अध्यादेश, १९४४ (१९४४ चा अध्यादेश क्रमांक ३८) अन्वये जिल्हा न्यायाधीशाकडून वापरण्याजोग्या सर्व शक्तींचा वापर करील आणि त्याची कार्ये करील.

६. (१) अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम १२क च्या पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही विशेष आदेशांच्या किंवा त्या कलमाच्या पोटकलम (२) च्या खंड (क) मध्ये उल्लेखिलेल्या आदेशाच्या व्यतिक्रमणासंबंधांत, कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, लोकसेवकाकडून करण्यात आल्याचे अभिकथित असलेल्या कोणत्याही अपराधाची विशेष न्यायाधीशाकडून संपरीक्षा केली जाते तेव्हा, या अधिनियमाच्या कलम ५ च्या पोटकलम (१) मध्ये किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या कलम २६० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष न्यायाधीश अपराधाची संक्षिप्त संपरीक्षा करील, आणि उक्त संहितेच्या कलम २६२ ते २६५ (दोन्ही धरून) यांचे उपबंध, शक्यतोवर, अशा संपरीक्षेला लागू होतील : **संक्षिप्त संपरीक्षा करण्याची शक्ती.**

परंतु, या कलमाखालील संक्षिप्त संपरीक्षेमधील कोणत्याही दोषसिद्धीच्या प्रकरणात, विशेष न्यायाधीशाने एक वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कारावासाचा शिक्षादेश देणे कायदेशीर ठरेल :

परंतु आणखी असे की, या कलमाखालील संक्षिप्त संपरीक्षेच्या प्रारंभी किंवा ती चालू असताना, विशेष न्यायाधीशाला असे वाटले की, प्रकरणाचे स्वरूप असे आहे की, एक वर्षापेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाचा शिक्षादेश द्यावा लागेल किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव प्रकरणाची संपरीक्षा संक्षिप्त रीत्या करणे अनिष्ट आहे तेव्हा, विशेष न्यायाधीश, पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, तशा आशयाचा आदेश नमूद करील आणि त्यानंतर ज्याची तपासणी झाली असेल अशा कोणत्याही साक्षीदाराला परत बोलावील आणि दंडाधिकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या अधिपत्र-खटल्यांच्या संपरीक्षेसाठी उक्त संहितेद्वारे विहित केलेल्या पद्धतीनुसार सुनावणीस किंवा फेरसुनावणीस सुरुवात करील.

(२) या अधिनियमात किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही विरुद्ध अंतर्भूत असले तरीही, एक महिन्याहून अधिक नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाचा आणि दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या द्रव्यदंडाचा शिक्षादेश विशेष न्यायाधीशाने या कलमान्वये संक्षिप्त-रीत्या संपरीक्षा केलेल्या अशा कोणत्याही प्रकरणात दिलेला असेल तेव्हा—मग अशा शिक्षादेशाखेरीज अन्य कोणताही आदेश उक्त संहितेच्या कलम ४५२ अन्वये काढण्यात आलेला असो वा नसो—सिद्धदोष व्यक्तीला कोणतेही अपील करता येणार नाही. परंतु विशेष न्यायाधीशाकडून पूर्वोक्त मर्यादेबाहेरील कोणताही शिक्षादेश देण्यात येईल तेव्हा त्याबाबतीत अपील करता येईल.

## प्रकरण तिसरे

### अपराध आणि शास्ती

लोकसेवकाने पदीय कार्याच्या बाबतीत वैध पारिश्रमिकाहून अन्य परितोषण घेणे.

७. लोकसेवक असलेला किंवा होणे अपेक्षित असलेला जो कोणी, कोणतेही पदीय कार्य करण्याबद्दल किंवा करण्यापासून परावृत्त राहण्याबद्दल अथवा केंद्रीय किंवा कोणतेही राज्य शासन किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे विधानमंडळ यांच्या संबंधात, अगर कलम २ च्या खंड (ग) मध्ये निर्देशिलेले कोणतेही स्थानिक प्राधिकरण, निगम किंवा शासकीय कंपनी यांच्या संबंधात, अगर लोकसेवक या नात्याने कोणत्याही लोकसेवकाच्या संबंधात मग तो नामित असो वा अन्यथा कोणत्याही व्यक्तीवर कसलाही उपकार किंवा अपकार करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिसी म्हणून वैध पारिश्रमिकाहून अन्य कोणत्याही प्रकारचे परितोषण स्वतःकरता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता कोणत्याही व्यक्तीकडून स्वीकारील किंवा मिळवील अथवा स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळविण्याचा प्रयत्न करील त्यास, सहा महिन्यांहून कमी नाही परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा दिली जाईल.

**स्पष्टीकरणे.**—(क) "लोकसेवक होणे अपेक्षित असलेला",– अधिकारपदावर येणे अपेक्षित नसलेल्या एखाद्या व्यक्तीने जर इतरांची, आपण अधिकारपदावर येण्याच्या बेतात आहोत आणि त्यानंतर आपण त्यांची सेवा करणार आहोत अशी भ्रामक समजूत करून देऊन परितोषण मिळवले तर, ती व्यक्ती ठकवणूक केल्याबद्दल दोषी होऊ शकेल, पण ती या कलमात व्याख्या केलेल्या अपराधाबद्दल दोषी असणार नाही.

(ख) "**परितोषण**"—"परितोषण" हा शब्द, आर्थिक परितोषणापुरता किंवा पैशात मूल्य करता येण्यासारख्या परितोषणापुरता मर्यादित नाही.

(ग) "**वैध पारिश्रमिक**"—"वैध पारिश्रमिक" हे शब्द, लोकसेवक कायदेशीरपणे मागू शकतो अशा पारिश्रमिकापुरते मर्यादित नाहीत, तर त्यांत, तो ज्या शासनाची किंवा संघटनेची सेवा करत असेल त्याने त्याला जे स्वीकारण्यास परवानगी दिली असेल त्या सर्व पारिश्रमिकांचा समावेश होतो.

(घ) "**करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिसी**".—जी व्यक्ती जे करणे आपल्याला उद्देशित नाही किंवा जे करण्याच्या स्थितीत ती नाही किंवा तिने केलेले नाही त्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिसी म्हणून परितोषण स्वीकारते ती व्यक्ती या शब्दाच्या कक्षेत येते.

(ङ) जेव्हा एखादा लोकसेवक शासनाकडे असलेल्या आपल्या वजनामुळे एखाद्या व्यक्तीवर आपल्याला हक्क प्राप्त होतो असे तिला चुकीने मानण्यास प्रवृत्त करतो आणि या सेवेसाठी बक्षीस म्हणून पैसा किंवा कोणतेही परितोषण देण्यास भाग पाडतो तेव्हा त्या लोकसेवकाने या कलमान्वये अपराध केलेला असतो.

लोकसेवकावर प्रभाव पाडण्यासाठी भ्रष्ट किंवा अवैध मार्गाने परितोषण घेणे.

८. एखाद्या लोकसेवकाच्या कोणतेही पदीय कार्य करण्यास किंवा करण्यापासून परावृत्त राहण्यास अथवा असा लोकसेवक म्हणून पदीय कार्याधिकार वापरताना कोणत्याही व्यक्तीवर कृपा किंवा अवकृपा करण्यास अथवा केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे विधान-मंडळ यांच्या संबंधात, अगर कलम २ च्या खंड (ग) मध्ये निर्देशिलेले कोणतेही स्थानिक प्राधिकरण, निगम किंवा शासकीय कंपनी यांच्या संबंधात अगर लोकसेवक या नात्याने कोणत्याही लोकसेवकाच्या संबंधात—मग तो नामित असो वा अन्यथा—कोणत्याही व्यक्तीवर कसलाही उपकार किंवा अपकार करण्यास भ्रष्ट किंवा अवैध मार्गाने प्रवृत्त करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिसी म्हणून कोणत्याही प्रकारचे परितोषण जो कोणी स्वतःकरता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता कोणत्याही व्यक्तीकडून स्वीकारील किंवा मिळवील अथवा स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील, त्याला सहा महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्य-दंडाचीही शिक्षा होईल.

लोकसेवकावर वैयक्तिक प्रभाव पाडण्यासाठी परितोषण घेणे.

९. एखाद्या लोकसेवकाला—मग तो नामित असो वा अन्यथा—कोणतेही पदीय कार्य करण्यास किंवा करण्यापासून परावृत्त राहण्यास अथवा असा लोकसेवक म्हणून पदीय कार्याधिकार वापरताना कोणत्याही व्यक्तीवर कृपा किंवा अवकृपा करण्यास अथवा केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे विधानमंडळ यांच्या संबंधात, अगर कलम २ च्या खंड (ग) मध्ये निर्देशिलेले कोणतेही स्थानिक प्राधिकरण, निगम किंवा शासकीय कंपनी यांच्या संबंधात अगर लोकसेवक या नात्याने कोणत्याही लोकसेवकाच्या संबंधात—मग तो नामित असो वा अन्यथा—कोणत्याही व्यक्तीवर कसलाही उपकार किंवा अपकार करण्यास भ्रष्ट किंवा अवैध मार्गाने प्रवृत्त करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिसी म्हणून कोणत्याही प्रकारचे परितोषण जो कोणी स्वतःकरता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता कोणत्याही व्यक्तीकडून स्वीकारील त्यास, सहा महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा होईल.

१०. कलम ८ व कलम ९ मध्ये व्याख्या केलेल्यांपैकी कोणतातरी अपराध ज्याच्या संबंधात करण्यात आला आहे असा लोकसेवक असणारा जो कोणी, त्या अपराधाला अपप्रेरणा देईल त्यास,—मग त्या अपप्रेरणेचा परिणाम म्हणून अपराध घडो वा न घडो, सहा महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा होईल.

लोकसेवकाने कलम ८ किंवा ९ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांस अपप्रेरणा दिल्याबद्दल शिक्षा.

११. जो कोणी लोकसेवक असून त्याने जी कोणतीही कार्यवाही किंवा व्यवहार केला आहे किंवा तसे करण्याच्या बेतात तो आहे त्यात जी व्यक्ती निबद्ध होती किंवा आहे किंवा होण्याचा संभव आहे हे त्यास माहीत असेल अथवा त्याच्या स्वतःच्या किंवा तो ज्यास दुय्यम आहे अशा कोणत्याही लोकसेवकाच्या पदीय कार्याधिकारांशी जिचा संबंध असेल, अथवा, याप्रमाणे निबद्ध असलेल्या व्यक्तीशी जी कोणतीही व्यक्ती, हितसंबंधित किंवा तिच्या नात्याची असल्याचे त्यास माहीत असेल, अशा व्यक्तीकडून कोणतीही मौल्यवान वस्तू प्रतिफलाविना किंवा जे अपर्याप्त असल्याचे त्यास माहीत आहे अशा प्रतिफलादाखल स्वतःकरता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता स्वीकारील किंवा मिळवील अथवा स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील, त्यास सहा महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा होईल.

लोकसेवकाने केलेल्या कार्यवाहीत किंवा व्यवहारात निबद्ध असलेल्या व्यक्तीकडून अशा लोकसेवकाने प्रतिफलाविना मौल्यवान वस्तू मिळवणे.

१२. जो कोणी कलम ७ किंवा कलम ११ खाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधास अपप्रेरणा देईल त्यास—मग त्या अपप्रेरणेचा परिणाम म्हणून अपराध घडो वा न घडो—सहा महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा होईल.

कलम ७ किंवा कलम ११ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांना अपप्रेरणा देण्याबद्दल शिक्षा.

१३. (१) एखाद्या लोकसेवकाने खालीलप्रमाणे वर्तन केल्यास त्याने फौजदारीपात्र गैरवर्तन केले असे म्हटले जाईल :—

लोकसेवकाचे फौजदारीपात्र गैरवर्तन.

(क) जर तो कोणत्याही व्यक्तीकडून स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी कलम ७ मध्ये उल्लेखिलेले, कोणत्याही वैध पारिश्रमिकाहून अन्य असे कोणतेही परितोषण, प्रलोभन किंवा बक्षिस म्हणून नित्यशः स्वीकारील किंवा मिळवील अथवा स्वीकारण्याचे मान्य करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील; अथवा

(ख) त्याने जी कोणतीही कार्यवाही किंवा व्यवहार केला आहे किंवा तसे करण्याच्या बेतात तो आहे त्यात जी व्यक्ती निबद्ध होती किंवा आहे किंवा होण्याचा संभव आहे हे त्यास माहीत असेल, अथवा, त्याच्या स्वतःच्या किंवा तो ज्यास दुय्यम आहे अशा कोणत्याही लोकसेवकाच्या पदीय कार्याधिकारांशी जिचा संबंध असेल अथवा, याप्रमाणे निबद्ध असलेल्या व्यक्तीशी जी कोणतीही व्यक्ती हितसंबंधित किंवा तिच्या नात्याची असल्याचे त्यास माहीत असेल तिच्याकडून कोणतीही मौल्यवान वस्तू प्रतिफलाविना किंवा जे अपर्याप्त असल्याचे त्यास माहीत आहे अशा प्रतिफलादाखल स्वतःकरता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता जर तो नित्यशः स्वीकारील किंवा मिळवील अथवा स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील; अथवा

(ग) लोकसेवक या नात्याने त्याच्याकडे सोपवण्यात आलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही मालमत्तेचा त्याने अप्रामाणिकपणे किंवा कपटाने अपहार केला वा स्वतःच्या उपयोगासाठी तिचे अन्यथा परिवर्तन केले अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीस तसे करू दिले तर; अथवा

(घ) जर त्याने,—

(एक) भ्रष्ट किंवा अवैध साधनांनी स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी कोणतीही मौल्यवान वस्तू किंवा आर्थिक फायदा मिळवला ; किंवा

(दोन) आपल्या लोकसेवक या पदाचा गैरवापर करून स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी कोणतीही मौल्यवान वस्तू किंवा आर्थिक फायदा मिळवला ; किंवा

(तीन) लोकसेवक या नात्याने पद धारण करीत असताना त्याने कोणतेही लोकहित न साधता कोणत्याही व्यक्तीसाठी कोणतीही मौल्यवान वस्तू किंवा आर्थिक फायदा मिळवला ; अथवा.

(ङ) जर लोकसेवकाकडे किंवा त्याच्यावतीने कोणत्याही व्यक्तीकडे, त्याच्या पद धारणाच्या कालावधीतील कोणत्याही वेळी, तो समाधानकारकपणे हिशेब देऊ शकणार नाही अशा आर्थिक साधनसंपत्तीच्या किंवा त्याच्या प्राप्तीच्या ज्ञात साधनांच्या विसंगत प्रमाणात मालमत्ता त्याच्याकडे असेल किंवा असली तर.

(२) फौजदारीपात्र गैरवर्तन करणाऱ्या कोणत्याही लोकसेवकाला एका वर्षाहून कमी नाही, परंतु, सात वर्षांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनांसाठी "प्राप्तीची ज्ञात साधने" याचा अर्थ, कोणत्याही कायदेशीर साधनाने मिळालेली प्राप्ती, असा आहे आणि अशी मिळकत लोकसेवकाला त्या काळापुरता लागू असलेला कोणताही कायदा, नियम किंवा आदेश यांच्या उपबंधानुसार कळविण्यात आलेली असते.

कलमे ८, ९ व १२ यांखाली नित्यशः अपराध करणे.

१४. जो कोणी,—

(क्) कलम ८ किंवा कलम ९ खालील शिक्षापात्र अपराध ; किंवा

(ख्) कलम १२ खालील शिक्षापात्र अपराध

नित्यशः करील त्याला दोन वर्षांहून कमी नाही., परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

प्रयत्नासाठी शिक्षा.

१५. जो कोणी, कलम १३ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग्) किंवा खंड (घ्) मध्ये उल्लेखिलेला अपराध करण्याचा प्रयत्न करील त्याला, तीन वर्षांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाचीही शिक्षा होईल.

द्रव्य दंड निश्चित करताना विचारात घ्यावयाच्या बाबी.

१६. कलम १३ च्या पोटकलम (२) अन्वये किंवा कलम १४ अन्वये द्रव्यदंडाचा शिक्षादेश देण्यात येईल तेव्हा, द्रव्यदंडाची रक्कम निश्चित करताना न्यायालय, आरोपी व्यक्तीने अपराध केल्यामुळे मिळवलेली रक्कम किंवा कोणतीही मालमत्ता मिळविली असल्यास, तिचे मूल्य, अथवा कलम १३ च्या पोटकलम (१) च्या खंड (ङ) मध्ये उल्लेखिलेल्या अपराधासाठी सिद्धदोष असेल तेव्हा, आरोपी व्यक्ती जिच्या संबंधात समाधानकारक रीत्या हिशेब देऊ शकत नाही अशी त्या खंडामध्ये उल्लेखिलेली आर्थिक साधनसंपत्ती किंवा मालमत्ता विचारात घेईल.

## प्रकरण चौथे

### या अधिनियमाखालील प्रकरणांचे अन्वेषण

अन्वेषण करण्यास प्राधिकृत व्यक्ती.

१७. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,—

(क्) दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेच्या बाबतीत, पोलीस निरीक्षक ;

(ख्) मुंबई, कलकत्ता, मद्रास व अहमदाबाद यांच्या महानगर क्षेत्रांमध्ये आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या कलम ८ च्या पोटकलम (१) अन्वये तशाप्रकारे अधिसूचित केलेल्या अन्य कोणत्याही महानगर क्षेत्रामध्ये, सहायक पोलीस आयुक्त ;

(ग्) अन्यत्र, पोलीस उप अधीक्षक किंवा समतुल्य दर्जाचा पोलीस अधिकारी,

यांच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी या अधिनियमाखालील शिक्षापात्र अशा अपराधाचे महानगर दंडाधिकारी किंवा प्रकरणपरत्वे, प्रथमवर्ग दंडाधिकारी यांच्या आदेशाशिवाय अन्वेषण करणार नाही किंवा अधिपत्राशिवाय त्यासाठी कोणतीही अटक करणार नाही :

परंतु, पोलीस निरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याला यासंबंधांत राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केले असल्यास, त्याला अशा कोणत्याही अपराधाचे, महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रकरणपरत्वे, प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या आदेशाविना अन्वेषणही करता येईल किंवा अधिपत्राशिवाय त्यासाठी अटकही करता येईल :

परंतु आणखी असे की, कलम १३ च्या पोटकलम (१) च्या खंड (ङ) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही अपराधाचे, पोलीस अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या आदेशाविना अन्वेषण केले जाणार नाही.

बँककार वह्यांचे निरीक्षण करण्याची शक्ती.

१८. कलम १७ अन्वये ज्याचे अन्वेषण करण्याची शक्ती एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला प्रदान करण्यात आली असेल असा अपराध करण्यात आल्याचा संशय घेण्यास, मिळालेल्या माहितीवरून किंवा अन्यथा, त्याला वाजवी कारण असेल आणि अशा अपराधाच्या अन्वेषणाच्या वा चौकशीच्या प्रयोजनार्थ बँककार वह्यांची निरीक्षणे करणे आवश्यक आहे असे त्याला वाटल्यास, त्याकाळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, तो अपराध ज्या व्यक्तीने केल्याचा संशय असेल अशा व्यक्तीच्या किंवा तिच्यावतीने पैसे ताब्यात ठेवण्याचा ज्या अन्य व्यक्तीवर संशय असेल अशा व्यक्तीच्या तिच्या खात्याशी संबंधित असतील अशा कोणत्याही बँककार वह्यांचे त्याला निरीक्षण करता येईल आणि त्यातील संबद्ध नोंदीच्या प्रमाणित प्रती घेता येतील किंवा घेववता येतील आणि असा पोलीस अधिकारी या कलमाखालील शक्तींचा वापर करीत असेल तेव्हा संबंधित बँकेने त्याला सहाय्य करणे आवश्यक असेल :

परंतु, पोलीस अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा पोलीस अधिकारी, त्याला पोलीस अधीक्षकाच्या किंवा त्यावरील दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याने यासंबंधात विशेषकरून प्राधिकृत केले असल्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीच्या खात्यासंबंधातील या कलमाखालील कोणत्याही शक्तीचा वापर करणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमामध्ये, "बँक" आणि "बँककार वह्या" या शब्दप्रयोगांना, बँककार वही पुरावा अधिनियम, १८९१ (१८९१ चा ८) मध्ये त्यांना अनुक्रमे जो अर्थ ठरवून दिला आहे तोच असेल.

## प्रकरण पाचवे

### खटल्यासाठी मंजुरी आणि इतर संकीर्ण उपबंध

**खटल्यासाठी पूर्वमंजुरी आवश्यक.**

१९. (१) जर कलमे ७, १०, ११, १३ आणि १५ अन्वये शिक्षापात्र अपराध लोकसेवकाने केल्याचे अभिकथित असेल तर, कोणतेही न्यायालय पुढीलप्रमाणे पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज अशा अपराधाची दखल घेणार नाही :—

(क) संघराज्याच्या कारभाराशी संबंधित नोकरीत असलेल्या आणि केंद्र शासनाच्या मंजुरीखेरीज पदावरून दूर करता न येणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत, त्या शासनाची ;

(ख) राज्याच्या कारभाराशी संबंधित नोकरीत असलेल्या आणि राज्य शासनाच्या मंजुरीखेरीज पदावरून दूर करता न येणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत, त्या शासनाची ;

(ग) अन्य कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, तिला तिच्या पदावरून दूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाची.

(२) पोटकलम (१) अन्वये आवश्यक असलेली पूर्वमंजुरी केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाने द्यावी किंवा कसे याबाबत कोणत्याही कारणाने संदेह निर्माण होईल त्या बाबतीत जेव्हा अभिकथित अपराध केला असेल त्यावेळी, लोकसेवकाला त्याच्या पदावरून दूर करण्यास, जे शासन किंवा प्राधिकरण सक्षम असेल त्याच शासनाकडून किंवा प्राधिकरणाकडून अशी मंजुरी दिली जाईल.

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,—

(क) विशेष न्यायाधीशाने काढलेला कोणताही निष्कर्ष किंवा दिलेला कोणताही शिक्षादेश वा आदेश, पोटकलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या मंजुरीचा अभाव किंवा त्यामध्ये कोणतीही चूक, वगळणूक किंवा अनियमितता आहे या कारणावरून, मात्र न्यायालयाच्या मते त्यामुळे न्याय निष्फळ होण्याचा प्रसंग उद्‌भवला असल्याखेरीज, एखाद्या न्यायालयाकडून अपिलात कायम करण्यात किंवा पुनरीक्षणात उलटवण्यात येणार नाही, किंवा त्यात फेरबदल करण्यात येणार नाही ;

(ख) प्राधिकरणाने दिलेल्या मंजुरीतील कोणतीही चूक, वगळणूक किंवा अनियमितता यांच्या आधारे तशी चूक, वगळणूक किंवा अनियमितता न्यायाच्या निष्फळतेमुळे उद्‌भवली असल्याची कोणत्याही न्यायालयाची खात्री झाल्याखेरीज, ते न्यायालय या अधिनियमान्वये कार्यवाही स्थगित करणार नाही;

(ग) कोणतेही न्यायालय, अन्य कोणत्याही कारणाने या अधिनियमाखालील कार्यवाही स्थगित करणार नाही आणि कोणतीही चौकशी, संपरीक्षा, अपील किंवा इतर कार्यवाही यामध्ये दिलेल्या कोणत्याही आंतर्वादिक आदेशाच्या संबंधात कोणतेही न्यायालय पुनरीक्षण शक्तींचा वापर करणार नाही.

(४) अशा मंजुरीच्या अभावामुळे किंवा त्यातील कोणतीही चूक, वगळणूक किंवा अनियमितता न्यायाच्या निष्फळतेस कारणीभूत झाली आहे किंवा त्यामुळे न्यायाची निष्फळता उद्‌भवली आहे किंवा नाही, हे पोटकलम (३) अन्वये ठरविताना, कार्यवाहीतील या आधीच्या टप्प्याला आक्षेप घेता आला असता आणि घेण आवश्यक होते किंवा कसे यासंबंधात न्यायालय विचार करील.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) चूक यामध्ये प्राधिकरणाच्या मंजुरी देण्याच्या सक्षमतेचा समावेश होतो ;

(ख) खटल्यासाठी आवश्यक मंजुरी यामध्ये, खटला एखाद्या विनिर्दिष्ट प्राधिकरणाच्या सांगण्यावरून किंवा एखाद्या विनिर्दिष्ट व्यक्तीच्या मंजुरीने चालवला जाईल अशा कोणत्याही आवश्यक गोष्टीचा किंवा तशाच स्वरूपाच्या अन्य कोणत्याही आवश्यक गोष्टींचा संदर्भ अंतर्भूत आहे.

**लोकसेवक वैध पारिश्रमिका-व्यतिरिक्त परितोषण स्वीकारतो त्यावेळेचे गृहीतक.**

२०. (१) कलम ७ किंवा कलम ११ किंवा कलम १३ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये शिक्षापात्र अपराधाच्या संपरीक्षेच्या वेळी जेव्हा आरोपी व्यक्तीने स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी कोणत्याही व्यक्तीकडून कोणतेही परितोषण (वैध पारिश्रमिकाव्यतिरिक्त) किंवा कोणतीही मौल्यवान वस्तू स्वीकारल्याचे किंवा मिळवल्याचे किंवा स्वीकारण्यास मान्यता दिल्याचे किंवा मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे सिद्ध झाले असेल तेव्हा, त्याविरुद्ध सिद्ध केले जाईपर्यंत, तिने कलम ७ मध्ये उल्लेखिलेले असे प्रलोभन किंवा बक्षिसी, विनाप्रतिफल किंवा, प्रकरणपरत्वे, जे अपर्याप्त असल्याचे तिला माहीत आहे अशा प्रतिफलासह, तसे परितोषण किंवा, प्रकरणपरत्वे, ती मौल्यवान वस्तू स्वीकारली किंवा मिळवली किंवा स्वीकारण्याचे मान्य केले वा मिळवण्याचा प्रयत्न केला असे गृहीत धरण्यात येईल.

(२) कलम १२ किंवा कलम १४ चा खंड (ख) या अन्वये शिक्षापात्र अपराधाच्या कोणत्याही संपरीक्षेच्या वेळी जेव्हा आरोपी व्यक्तीने कोणतेही परितोषण (वैध पारिश्रमिकाव्यतिरिक्त) किंवा कोणतीही मौल्यवान वस्तू देण्यात आली असल्याचे किंवा देऊ केल्याचे किंवा देऊ करण्याचा प्रयत्न केल्याचे सिद्ध करण्यात येईल तेव्हा, एतद्विरुद्ध सिद्ध केले जाईपर्यंत, तिने कलम ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रलोभन

किंवा बक्षिसी म्हणून अथवा प्रतिफलाविना, किंवा, प्रकरणपरत्वे, जे अपर्याप्त असल्याचे तिला माहीत आहे अशा प्रतिफलासह, ते परितोषण वा ती मौल्यवान वस्तू दिली अथवा देऊ केली किंवा देण्याचा प्रयत्न केला असे गृहीत धरले जाईल.

(३) पोटकलमे (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, जर परितोषण किंवा उपरोक्त वस्तू ही, न्यायालयाच्या मते इतकी क्षुद्र असेल की त्यावरून भ्रष्टाचाराचे अनुमान काढणे अनुचित ठरले तर, न्यायालय कोणत्याही उक्त पोटकलमात निर्दिष्ट केलेले गृहीतक नाकारू शकेल.

आरोपी व्यक्ती सक्षम साक्षीदार असणे.

२१. या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराधाचा आरोप करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती ही, बचावपक्षासाठी सक्षम साक्षीदार असेल आणि तिच्या विरुद्ध किंवा त्याच संपरीक्षेत तिच्याबरोबर जिच्या विरुद्ध आरोप करण्यात आलेले असतील अशा व्यक्तींविरुद्ध केलेल्या आरोपांच्या नाशाबितीसाठी तिला शपथेवर साक्ष देता येईल :

परंतु,—

(क) तिने स्वत: विनंती केल्याखेरीज तिला साक्षीदार म्हणून बोलविले जाणार नाही ;

(ख) तिने साक्ष दिली नाही तर त्यामुळे अभियोगपक्षाकडून त्यावर कोणतेही भाष्य केले जाणार नाही किंवा तिच्या विरुद्ध वा त्याच संपरीक्षेत तिच्याबरोबर आरोप करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तींविरुद्ध कोणत्याही गृहीतकास कारणीभूत होणार नाही ;

(ग) ज्याबद्दल तिच्यावर आरोप करण्यात आला आहे अशा अपराधाव्यतिरिक्त अन्य कोणताही अपराध तिने केला आहे किंवा त्या अपराधाबद्दल तिला सिद्धदोष ठरवण्यात आले आहे किंवा ती वाईट चारित्र्याची आहे असे दर्शविण्याकडे ज्याचा कल आहे असा कोणताही प्रश्न खालील परिस्थितीखेरीज तिला विचारला जाणार नाही आणि विचारल्यास, उत्तर देण्यास भाग पाडले जाणार नाही :—

(एक) तिने असा अपराध केल्याचा किंवा अशा अपराधाबद्दल ती सिद्धदोष असल्याचा पुरावा हा, ज्या अपराधाचा तिच्यावर आरोप करण्यात आला आहे त्याबद्दल ती दोषी असल्याचा ग्राह्य पुरावा असेल तेव्हा; किंवा

(दोन) स्वत:चे चारित्र्य चांगले आहे असे सिद्ध करण्यासाठी तिने कोणत्याही अभियोगपक्षाच्या साक्षीदाराला व्यक्तिश: किंवा तिच्या वकिलामार्फत कोणताही प्रश्न विचारला असेल किंवा स्वत:च्या चांगल्या चारित्र्याचा पुरावा दिला असेल तेव्हा, अथवा बचावाचे स्वरूप किंवा कामकाज असे आहे की, अभियोक्त्याच्या वा अभियोगपक्षाच्या कोणत्याही साक्षीदाराच्या चारित्र्यावरील अभ्यारोपाचा अंतर्भाव असेल तेव्हा; किंवा

(तीन) त्याच अपराधाबद्दल आरोप करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीविरुद्ध तिने पुरावा दिला असेल तेव्हा.

विशिष्ट फेरबदलांच्या अधीनतेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) लागू होणे.

२२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) हिचे उपबंध, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराधांच्या संबंधातील कोणत्याही कार्यवाहीला ते लागू असतील तेव्हा ते पुढीलप्रमाणे परिणामक होतील :—

(क) कलम २४३ च्या पोटकलम (१) मध्ये "आरोपीला त्यानंतर बोलावण्यात येईल" या शब्दांऐवजी जणू काही "आरोपीस तात्काळ किंवा न्यायालय परवानगी देईल अशा अवधीत, आपले साक्षीदार म्हणून तो ज्यांची तपासणी करू इच्छितो अशा व्यक्तींची (कोणत्याही असल्यास) आणि तो ज्यांवर अवलंबून राहण्याचे ठरवितो अशा दस्तऐवजांची (कोणतेही असल्यास) यादी देण्यास फर्मावण्यात येईल आणि त्यानंतर त्याला बोलवण्यात येईल" हे शब्द घालण्यात आले असल्याप्रमाणे.

(ख) कलम ३०९ च्या पोटकलम (२), तिसऱ्या परंतुकानंतर, जणू काही खालील परंतुक घालण्यात आले असल्याप्रमाणे, ते असे:—

"परंतु आणखी असे की, कलम ३९७ खालील अर्ज कार्यवाहीतील पक्षकाराने केला असल्याच्याच कारणावरून कार्यवाही पुढे ढकलली किंवा स्थगित केली जाणार नाही.";

(ग) कलम ३१७ च्या पोटकलम (२) नंतर जणू काही खालील पोटकलम घालण्यात आले असल्याप्रमाणे :—

"(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही न्यायाधीश, त्याला योग्य वाटल्यास, आणि त्याने नोंद करावयाच्या कारणांसाठी, आरोपीच्या किंवा त्याच्या वकिलाच्या अनुपस्थितीत, चौकशी किंवा संपरीक्षा सुरू करू शकेल आणि साक्षीदाराला उलटतपासणीसाठी पुन्हा बोलविण्याच्या आरोपीच्या अधिकाराच्या अधीनतेने कोणत्याही साक्षीदाराचा पुरावा नोंदवू शकेल";

(घ) कलम ३९७ च्या पोटकलम (१) मध्ये स्पष्टीकरणापूर्वी जणू काही खालील परंतुक घालण्यात आले असल्याप्रमाणे :—

"परंतु, अशा कार्यवाहीतील एखाद्या पक्षकाराच्या अर्जावरून या कलमाखालील शक्ती न्यायालयाकडून वापरण्यात येत असतील तेव्हा, :—

(क) अभिलेख का मागविण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दाखविण्यास दुसऱ्या पक्षकाराला संधी दिल्याशिवाय ; किंवा

(ख) प्रमाणित प्रतींवरून कार्यवाहीच्या अभिलेखाची तपासणी करता येईल याबद्दल त्याची खात्री पटली असेल तर,

न्यायालय, सामान्यतः कार्यवाहीचा अभिलेख मागविणार नाही".

कलम १३(१)(ग) खालील अपराधा-संबंधातील आरोपामधील तपशील.

२३. "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, आरोपीवर कलम १३ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) खालील अपराधाचा आरोप करण्यात येतो तेव्हा, जिच्या संबंधात अपराध केल्याचे अभिकथित असेल त्या मालमत्तेचे वर्णन आणि ज्यांच्या दरम्यान अपराध केल्याचे अभिकथित असेल त्या तारखा यांचे वर्णन, विशिष्ट वस्तू किंवा नेमक्या तारखा विनिर्दिष्ट न करता, आरोपामध्ये करता येईल आणि अशा तऱ्हेने मांडणी केलेला दोषारोप, उक्त संहितेच्या कलम २१९ च्या अर्थान्तर्गत, एका अपराधाचा दोषारोप असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, यांपैकी पहिल्या व शेवटच्या तारखेमधील कालावधी एका वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

एखाद्या व्यक्तीचे निवेदन तिला खटल्यास दायी करणार नाही.

२४. त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कलम ७ ते ११ खालील किंवा कलम १३ वा कलम १५ खालील अपराधाबद्दलच्या लोकसेवकाविरुद्धच्या कोणत्याही कार्यवाहीत, एखाद्या व्यक्तीचे, आपण लोकसेवकाला कोणतेही परितोषण ( वैध पारिश्रमिकाव्यतिरिक्त) किंवा कोणतीही मौल्यवान वस्तू देऊ केली किंवा देऊ करण्यास कबूल झालो हे निवेदन तिच्यावरील कलम १२ खालील खटल्यात दाखल केले जाणार नाही.

भूसैनिकी, नौसैनिकी आणि वायुसैनिकी वा इतर कायद्यावर परिणाम होणार नाही.

२५. (१) भूसेना अधिनियम, १९५० (१९५०चा ४५), वायुसेना अधिनियम, १९५० (१९५०चा ४६) नौसेना अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६२) सीमा सुरक्षा बल अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४७) तट रक्षक अधिनियम, १९७८ (१९७८ चा ३०) आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षक अधिनियम, १९८६ (१९८६ चा ४७) खाली कोणतेही न्यायालय किंवा इतर प्राधिकरण यांनी वापरावयाची अधिकारिता किंवा त्यांना लागू होऊ शकणारी प्रक्रिया यावर या अधिनियमातील काहीही परिणामक होणार नाही.

(२) शंकानिरसनार्थ, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, पोटकलम (१) मध्ये, उल्लेखिलेल्या अशा कोणत्याही कायद्याच्या प्रयोजनार्थ, विशेष न्यायाधीशाचे न्यायालय हे सामान्य फौजदारी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल.

१९५२ च्या अधिनियम क्रमांक ४६ अन्वये नियुक्त केलेले विशेष न्यायाधीश या अधिनियमान्वये नियुक्त केलेले न्यायाधीश असतील.

२६. कोणत्याही क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी फौजदारी कायदा विशोधन अधिनियम, १९५२ अन्वये नियुक्त केलेला आणि या अधिनियमाच्या प्रारंभी पद धारण करीत असलेला प्रत्येक विशेष न्यायाधीश हा या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये त्या क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्त केल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार, अशा प्रारंभी आणि प्रारंभापासून असा प्रत्येक न्यायाधीश, अशा प्रारंभी त्याच्या पुढे प्रलंबित असलेल्या सर्व कार्यवाही या अधिनियमाच्या उपबंधानुसार हाताळील.

अपील व पुनरीक्षण.

२७. विशेष न्यायाधीशाचे न्यायालय हे, जणू काही उच्च न्यायालयाच्या स्थानिक सीमांमधील खटल्यांची संपरीक्षा करणारे न्यायालय असल्याप्रमाणे उच्च न्यायालय, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये उच्च न्यायालयाला प्रदान करण्यात आलेल्या अपीलाच्या व पुनरीक्षणाच्या सर्व शक्ती, त्या लागू असतील तेथपर्यंत, या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने वापरू शकेल.

हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याच्या भरीला असेल.

२८. या अधिनियमाचे उपबंध, त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याला न्यूनकारी नसून त्याला भर म्हणून असतील आणि कोणत्याही लोकसेवकाविरुद्ध, या अधिनियमाखेरीज दाखल करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीतून या अधिनियमातील कोणत्याही बाबीमुळे त्याला सूट मिळणार नाही.

१९९४ च्या अध्यादेश क्र. ३८ याचे विशोधन.

२९. फौजदारी कायदा विशोधन अध्यादेश, १९४४ यामध्ये,—

(क) कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये, कलम ९ च्या पोटकलम (१) मध्ये, कलम १० च्या खंड (क) मध्ये, कलम ११ च्या पोटकलम (१) मध्ये आणि कलम १३ च्या पोटकलम (१) मध्ये, "राज्य शासन" हे शब्द जेथे येतील तेथे त्याऐवजी राज्य शासन, किंवा, प्रकरणपरत्वे "केंद्र शासन" हे शब्द घालण्यात येतील ;

(ख) कलम १० मधील खंड (क) मध्ये, "तीन महिने" या शब्दांऐवजी "एक वर्ष" हे शब्द घालण्यात येतील ;

(ग) अनुसूचीमध्ये,—

(एक) परिच्छेद १ वगळण्यात येईल ;

(दोन) परिच्छेद २ व ४ मध्ये,—

(क) "स्थानिक प्राधिकरण" या शब्दानंतर, "किंवा केंद्रीय, प्रांतीत वा राज्य अधिनियमाद्वारे वा अन्वये स्थापन करण्यात आलेला निगम अथवा शासनांच्या मालकीचे किंवा शासनाकडून नियंत्रित वा सहाय्यित प्राधिकरण वा निकाय अथवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम ६१७ अन्वये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे शासकीय कंपनी अथवा असा निगम, प्राधिकरण, निकाय वा शासकीय कंपनी यांच्याकडून सहाय्यित सोसायटी" हे शब्द व आकडे घालण्यात येतील.

(ख) "किंवा प्राधिकरण" या शब्दानंतर "किंवा निगम किंवा निकाय किंवा शासकीय कंपनी किंवा सोसायटी" हे शब्द घालण्यात येतील.

(तीन) ४ क या परिच्छेदाऐवजी पुढील परिच्छेद घालण्यात येईल, तो असा :—

"४क. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये शिक्षापात्र अपराध." ;

(चार) परिच्छेद ५ मध्ये, "बाबी २, ३ व ४" हे शब्द व आकडे यांऐवजी "बाबी २, ३, ४ आणि ४क" हे शब्द आकडे व अक्षरे घालण्यात येतील.

**निरसन व व्यावृत्ती.** ३०. (१) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ (१९४७ चा २) आणि फौजदारी कायदा विशोधन अधिनियम, १९५२ (१९५२ चा ४६) याद्वारे निरसित झाले आहेत.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) चे कलम ६ लागू करण्यास बाध न आणता, अशा प्रकारे निरसित झालेल्या अधिनियमांन्वये किंवा अधिनियमानुसार केलेली अथवा केली असल्याचे भासणारी कोणतीही गोष्ट किंवा कृती, ती या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधानुसार केल्याचे समजण्यात येईल.

**१८६० च्या अधिनियम क्र. ४५ याच्या विवक्षित कलमांची वगळणूक.** ३१. भारतीय दंड संहितेची कलमे १६१ ते १६५क (दोन्ही धरून) वगळण्यात येतील आणि उक्त कलमे केंद्रीय अधिनियमाद्वारे जणू काही निरसित झाली असल्याप्रमाणे सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) चे कलम ६ अशा वगळणुकीला लागू होईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई